महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**महत्त्वाचे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी(१९-२०)/पुवि/२०१९/3443
दिनांक :- 4 MAY 2019

प्रति,

**सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

**विषय :- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१९-२० मधील कॉलेज नोंदणीबाबत**

**संदर्भ:- १) शासन निर्णय , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः प्रवेश-२०१६/(१८०/१६) /एसडी-२ दिनांक ०७.०१.२०१७**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१९/प्र.क्र.३३३/एसडी-२,दि.०७.०३.२०१९**
**३) या कार्यालयाचे पत्र दि.३०.०४.२०१९**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० साठी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची ऑनलाईन नोंदणी साठी संकेतस्थळावरील जाऊन माहिती भरुन दि.०३ ते १० मे २०१९ या दरम्यान खालील मुद्दयानुसार एस एम जोशी महाविद्यालय, हडपसर पुणे येथे संपूर्ण फाईल सादर करावी.

१) प्रथम http://pune.11thadmission.net या प्रवेशाच्या संकेतस्थळावरील आपल्या महाविद्यालयाची माहिती कॉलेज प्रोफाईल मधील सन २०१९-२० ची सर्व माहिती वाचून तपासावी.

२) किरकोळ बदल असल्यास – तसेच प्राचार्य , उपप्राचार्य, तंत्रसहाय्यक, इतर कर्मचारी यांच्या नावात मोबाईल क्रमांकामध्ये बदल असल्यास तसे पत्र फाईलमध्ये सादर करावे. व त्याप्रमाणे रजिस्ट्रेशन लिंक सुरु झाल्यावर कॉलेज स्तरावरुन सदरचे किरकोळ बदल करावेत.

३) महत्त्वाचे बदल :- सन २०१९-२० च्या रजिस्ट्रेशन केलेल्या माहिती मध्ये जर नवीन तुकडी, शाखा व फी मध्ये बदल करावायाचा असल्यास असा स्वतंत्र प्रस्ताव शिक्षण उपसंचालक यांच्याकडे मुख्य केंद्रावर सादर करावा.व त्यांची मान्यता मिळाल्यानंतरच सदर बदल मुख्य केंद्रावर येऊन प्रत्यक्षपणे विहित मुदतीत करावा.

४) नवीन मान्यता मिळालेले उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय--- सन २०१८-१९ मध्ये नोंदणी नसलेल्या व नव्याने मान्यता मिळालेल्या अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह मुख्य केंद्रावर पुढील वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करणे अनिवार्य आहे.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | झोन क्रमांक | झोन चे नांव | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पुणे शहर विभाग | ०६.०५.१९ | १०.३० ते २ | एस एम जोशी कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर पुणे |
| २ | २ | कर्वेनगर/कोथरुड विभाग | | | |
| ३ | ३ | पर्वती/धनकवडी/स्वारगेट विभाग | ०७.०५.१९ | दु.३ ते ५. | |
| ४ | ४ | सिंहगड रोड विभाग | | | |
| ५ | ५ | कॅम्प/येरवडा विभाग | ०८.०५.१९ | स.१०.३० ते २ | |
| ६ | ६ | हडपसर विभाग | | | |



Scanned by CamScanner

| अ.क्र. | झोन क्रमांक | झोन चे नांव | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ७ | शिवाजीनगर/औंध/पाषण विभाग | ०९.०५.१९ | दु.३ ते ५. | एस एम जोशी कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर पुणे |
| ८ | ८ | पिंपरी-भोसरी विभाग | | | |
| ९ | ९ | चिंचवड-निगडी विभाग | | | |
| १० | उर्वरित सर्व | उर्वरित सर्व | १०.०५.१९ | स.११ ते ५ | |

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे
**प्रत कार्यवाही साठी :-**
**१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.पुणे**
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पुणे महानगरपालिका
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ,पुणे
**प्रत :- प्राचार्य, एस एम जोशी महाविद्यालय, हडपसर , पुणे-२८**

Scanned by CamScanner